Vol 5 Issue 2 March 2015

ISSN No : 2230-7850

International Multidisciplinary Research Journal

# *Indian Streams Research Journal*

Executive Editor
Ashok Yakkaldevi

Editor-in-Chief
H.N.Jagtap

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.org**

Indian Streams Research Journal
ISSN 2230-7850
Impact Factor : 3.1560(UIF)
Volume-5 | Issue-2 | March-2015
Available online at www.isrj.org

# *सामाजिक स्थित्यंतरे आणि मराठी कादंबरी*

*दिलीप अलोणे.*

वणी ता.वणी जि.यवतमाळ.

***सारांश :–*** साहित्य हे समाजात, समाजासाठी, व समाजातील व्यक्तीद्वारा निर्माण होते. 'सहितस्य भावः 'इति साहित्य' या व्याख्येप्रमाणे समाजाच्या सह जाणारे, समाजाच्या संगतीने जाणारे असे साहित्याचे स्वरुप असते. म्हणजेच साहित्य हे समाजसापेक्ष असते. एका दृष्टीने साहित्य समाजाची सांस्कृतिक गरज भागविणारी निर्मिती असते. मार्क्सवादी कल्पनेप्रमाणे समाजाच्या आर्थिक पायावर कलासाहित्याची अधिसंरचना उभी असते म्हणूनच समाजाच्या स्थीतीगतीचा परिणाम साहित्यनिर्मितीवर होत असतो. समाजाची ज्या प्रकारची स्थितीगती असेल, ज्या प्रकारचे कालाचे आव्हान असेल, ज्या प्रकारच्या जीवनविषयक मूल्यकल्पना असतील त्यावर साहित्य व समाज यांचे परस्परसंबंध अवलंबून असतात.

***प्रस्तावना :–***

साहित्यनिर्मिती करणारा लेखक काही एक समाजाचाच घटक असतो. तो समाजातच जन्मतो, जगतो व मरतो, त्यामुळे जन्मापासून तो एका अखंड सामाजिकीकरणाच्या प्रक्रियेने संस्कारित होत असतो. त्यांच्या लौकिक जिण्याचे क्षेत्र समाजातच असते. व लेखक म्हणून तो करीत असलेली वाङ्मःयीन निर्मिती ही देखील समाजातच होते. ती समाजासाठी असते. व समाजातून त्याने घेतलेल्या अनुभवाचे अन्वयार्य लावणारी असते. माणूस ज्या समाजात जन्मतो, त्या समाजाची सगळी पूर्वपरंपरा, रुढी यांचा वारसा त्याला नकळत प्राप्त होत असतो. लेखक आपल्या अमूर्त अशा प्रतिभाशक्तीला साकार करतो, समूर्त करतो, तो सामाजिक संस्काराच्या अनुभवांच्या कल्पनांच्या माध्यमातूनच सामाजिकता व सर्जनशक्ती यांच्या विधायक मिश्रणातूनच साहित्यिकाची साहित्यिकता सिध्द होते.

वाङ्ःमय प्रकारातील 'कादंबरी' या प्रकाराचा आवाका आणि त्यांची व्यापकता लक्षात घेतली, म्हणजे कादंबरी हा वाङ्ःमयप्रकार सामाजिक दस्ताऐवज म्हणून पुढे येतो. कथा, काव्य, नाटक, ललित लेख, वैचारिक लेखन, आत्मचरित्र या सर्व प्रकारांपेक्षा कादंबरीत आजूबाजूचे वास्तव अधिक प्रमाणात प्रतिबिंबीत होत असते. त्या त्या काळातील सामाजिक परिवर्तनाच्या नोंदी समकालीन कादंब-यातून दृष्टिगोचर होत असतात. त्यामुळेच देशातील स्थिती, गती प्रगती आणि मुल्य-हास ' कादंबरी ' हाच वाङ्ःमयप्रकार अधिक प्रभाविपणे टिपत असतो. सामाजिक स्थित्यंतराचा प्रभाव कळतनकळत कादंबरी या वाङ्ःमयप्रकारात गडदपणे उजागर होताना जाणवतो.

१८५७ मधील बाबा पदमनजी यांची '' यमुनापर्यटन '' ही मराठीतील पहिली सामाजिक वास्तववादी व समस्याप्रधान कादंबरी मानल्या जाते. या पहिल्याच कादंबरीने समकालीन सामाजिक वास्तवाचे संदर्भ अधोरेखित केले आहेत.

तत्कालीन हिंदू धर्मातील विधवांचे दुःख त्यात प्रकट झाले आहे. हरी नारायण आपटे, यांना आधुनिक कादंबरीचे जनक मानल्या जाते. त्यांनी १८८६ साली रेनॉल्डस्च्या ''मिस्टरीज ऑफ ओल्ड लंडन'' च्या धर्तीवर 'मधली स्थिती' ही पहिली कादंबरी लिहली व त्यानंतर करमणूक साप्ताहिकातून 'पण लक्षात कोण घेतो' ही कादंबरी १८६३ मध्ये क्रमशः प्रसिध्द झाली. हरिभाऊंचा पिंड ध्येयवादी सुधारकाचा होता. त्यांच्या सामाजिक कादंब-यातील जग मध्यमवर्गीयांचे आहे. त्या काळातील त्या वर्गातील स्त्री-पुरुषांच्या, विशेषत्वाने स्त्रियांच्या समस्या त्यांनी मुख्यत्वे मांडल्या. लक्ष्मण मोरेश्वर हळबे यांच्या 'मुक्तामाला' (१८६१) व 'रत्नप्रभा' या दोन कांदब-या त्या काळात आल्या तत्कालीन सामाजिक अभिरुची लक्षात घेऊन ते लेखन होते. त्या अद्भूतरस प्रधान होत्या.

१६२७ मधील '' गोंडवनातील प्रियवंदा '' यासह 'परागंदा', 'आशावादी', 'गावसासू', 'विलक्षणा,' 'भटक्या' व १६३० मधील 'ब्राम्हणकन्या' अश्या सात कादंब-या डॉ.श्रीधर व्यंकटेश केतकरांनी लिहल्या. विविध समाजसमूहांची

अभिनव माहिती, मानवी मनाच्या अंगाची मर्मग्राही उकल व समाज सुधारणेसंबंधी असलेले क्रांतिकारक विचार त्यातून व्यक्त होतात.

अव्वल इंग्रजीतील प्रबोधनाच्या प्रक्रियेमुळे समाजात वैचारीक खळबळ सुरु झाली होती. जुन्यानव्यांचा संघर्ष वाढून राजकीय, सामाजिक, प्रश्नांना हात घालण्यात येत होता. स्त्रीशिक्षणांच्या झालेल्या प्रारंभाने मध्यवर्गीय घरात मत्सराचे वातावरण निर्माण झाले होते. वामन मल्हार जोशीनी प्रथमच एका शुध्द आणि स्वतंत्र तत्वजिद्नासेने जिवनाकडे पाहिल्याचे त्यांच्या कादंब-यांवरुन लक्षात येते. त्याकाळात उच्च शिक्षण घेतलेल्या स्त्रियांच्या समोर उभ्या राहणा-या प्रश्नांना त्यांनी हात घातला. महाराष्ट्रीय जिवनाचे अधिक मूलगामी तत्वशोधन त्यांनी केले. वि.स.खांडेकरांनी जिवनातील विविध समस्यांची चर्चा करीत मनुष्य स्वप्रांवर जगत नसून तो ध्येयावर जगतो असा जिवनवादी दृष्टीकोण कादंब-यांतून व्यक्त केला. गं.त्र्य.माडखोलकरांनीही ‘‘ चंदनवाडी ’’ या कादंबरीच्या निमित्याने नागपूरातील ‘‘ उंटरवाना ’’ वस्तीच्या माध्यमातूनच अस्पृश्य वस्तीचे वास्वववादी चित्रण केले.

१८५० नंतर पहिली मराठी कादंबरी जन्मास आली. तेव्हा इंग्रजी शिक्षण, इंग्रजांचे कायदे, खिस्ती धर्माचा मिशन-यांमार्फत होणारा प्रचार, प्रसार इत्यादी कारणांनी उद्भवलेले सामाजिक संक्रमण, विधवाविवाह, स्त्रियांचे शिक्षण, वधूवरांच्या संमतीने विवाह या विषयांनी समाजमन ढवळून निघत होते. १९१४ ते १९१८ या चार वर्षातील पहिल्या जागतिक महायुध्दाने महाराष्ट्रातील कारकुनी पेशाच्या मध्यमवर्गाचे महत्व वाढीला लागले.

त्यांची आर्थिक स्थिती थोडयाफार प्रमाणात सुधारली व वाङ्मयीन अभिरुचीही बदलली. या काळात सामाजिकस्थित्यंतराचा प्रभाव कादंब-यात खूनावू लागता होता.

भारतात पुनरुज्जीवनाची पावले प्रथम बंगाल आणि नंतर महाराष्ट्रातच प्रामुख्याने उमटली. जागृत झालेल्या समाजाच्या अंत:प्रेरणेने आणि बदलत्या परिस्थितीच्या प्रभावाने सामाजिक स्थित्यंतरे घडू लागली. इंग्रजी सत्तेने या देशात आपले पाय घट्ट रोवले तेव्हा एका प्रचंड निद्रेतून भारतीय समाज जागृत होऊ लागला. इंग्रजांच्या आक्रमणाने भारतीयांच्या जीवनातील कितीतरी क्षेत्रात हस्तक्षेप केला. अज्ञान, दारिद्रय आणि धर्मभोळेपणा यामुळे भारतीय मने नि:सत्व झाली होती. याचे पडसाद लेखनातही उमटू लागले होते.

महाराष्ट्रात एकोणविसाव्या शतकाच्या पूर्वार्धात प्रबोधनकारांच्या चळवळीमुळे समाजजागृती धडू लागली. सुधारणावादी आधुनिक विचाराने हिंदु विचारसरणी दूर सारीत चातुर्वर्ण्य, अस्पृश्यता, स्त्रीपुरुषभेद, विषमता, उच्च-निचता या परंपरागत विचारांना त्याज्य ठरविले. या सुधारणावादी पुरोगामी विचारांना मराठी कादंबरीत मात्र हवा तसा प्रवेश झाला नाही.

१८६५ ते १८७५ या काळात इंग्रजी संस्कारामुळे सार्वजनिक सभा, पुणे-मुंबई वक्तृत्वोत्तेजक सभा, प्रार्थनासमाज इत्यादी अनेक संस्थाचा पाया घातला गेला. याच काळात निंबधमालेला प्रारंभ झाला. समकालीन जीवनाविषयी दृष्टिकोन बदलू लागला. अशा वेळेस मराठीमध्ये ऐतिहासिक कादंबरी निर्माण झाली. कारण लेखकाला, पूर्वजांचे इतिहास पाहणे महत्वाचे वाटले. पूर्वजांचे जीवन त्यांच्या आशा-आकांक्षा, त्यांच्यावर आलेल्या आपत्ती, आपत्तींना त्यांनी दिलेली झुंज, त्याचप्रमाणे त्याकाळचे समाजकारण आणि राजकारण जाणून घेण्याच्या दृष्टीने ऐतिहासिक कादं-यांचे लेखन झाले.

सुधारणावादी विचार आणि स्त्रि शिक्षण, विधवाविवाह, सतीची चाल या प्रश्नांसोबत महात्मा ज्योतिबा फुले आणि आगरकर यांनी हाताळलेल्या बहुजनांच्या प्रश्नामुळे हरिभाऊ आपटेच्या
कादंबं-यामध्ये या विचारांचा प्रभाव डोकावतो. खांडेकरांच्या विचारांवर सुधारणावाद, गांधीवाद, समाजवाद याचा प्रभाव दिसतो. मात्र त्यांची कादंबरी मध्यमवर्गापुरतीच मर्यादित राहयली.

पहिल्या महायुध्दाची झळ इतर देशाप्रमाणे काही प्रमाणात भारतदेशालाही पोचली होती. त्याप्रमाणे लोकांच्या जिवनजाणीवातही बदल झाला होता. स्वातंत्र्याच्या चळवळीचे विचार सर्वत्र देशभर पसरविले जात होते.

गांधीवादी विचारसरणीने लोक भारावून गेले होते. कादंबरीत काही प्रमाणात दिसणारे विश्वकुटूंब किंवा आंतरजातीय विवाह हे त्याचेच प्रत्यय होय. मात्र गांधीजीचा हरिजनोध्दार कादंब-यात दुर्लक्षितच राहला. महाराष्ट्रीय जिवनात समाजवादाचा प्रभाव गांधीयुगातच पडला. समाजवाद आणि गांधीवाद एकाचवेळेला कादंबरीत डोकावताना दिसतो. माडखोलकरांच्या कादंब-यातूनच तो जाणवत असला तरी तोही मध्यम वर्गापूरताच मर्यादित आहे.

१९४७ नंतर मराठी कादंबरी नव्या अवकाशाच्या शोधात निघाली. स्वतंत्र्योत्तर काळात एकूणच समाजजीवनाकडे बघण्याची दृष्टी बदलली तव्दत मराठी वाङ:मयाकडे बघण्याचीही दृष्टी पालटली. शैक्षणिक वातारणाच्या अभिसरणामुळे आजवरच्या वंचित आणि उपेक्षित समाजाच्या मूळ भावना शब्द शोधू लागले. मराठी कादंबरीने यापूर्वि स्पर्श न केलेल्या जीवनाचे चित्रण, सामान्य, शोषित, आणि तळागाळातील मानसाच्या भावभावना, जाणिवा, व्यथा वेदना कादंब-यातून व्यक्त होऊ लागल्या.

१९५० ते १९६० हे स्वातंत्र्योत्तर काळातील पहिले दशक. याच कालखंडात कादंब-यांचे विपूल प्रमाणात लेखनही झाले. या कालखंडातील कादंबरीलेखनावर भारतीय स्वातंत्रयुध्द, स्वातंत्र्यपूर्व काळातील परिस्थिती, भारतीय स्वातंत्र्यप्राप्ती, गांधीजींचा वध, पोलीस ॲक्शन, निजामी राजवटीची क्रुरता, अस्पृश्यता निर्मुलनाचे प्रयत्न, प्रादेशिकवाद, कमाल जमीन धारणा कायदा, फिरंग्यांचा अत्याचार, राजकीय व्यक्तींची सत्ता व संपतीलालसा, संयमाचे घटते महत्व, देशातील दारिद्रय, फाडचे तत्वज्ञान, नात्या-नात्यातील संपत चाललेले पावित्र्य, रझाकारांचा अत्याचार, देशातील अंधश्रध्दा, आर्थिक मंदीची

लाट, लोकांची शहराकडे होणारी धाव, स्त्री शिक्षणावरील भर, कामगार चळवळी या विविध सामाजिक घटनांच्या स्थित्यंतराचे प्रतिबिंब कादंब-यांतून उमटू लागले.

१९५० याली प्रकाशित झालेल्या विभावरी शिरुरकरांच्या '' बळी '' या कादंबरीतून स्वातंत्र्यपूर्व काळातील गुन्हेगार जातींवर इंग्रजांचा होणारा अन्याय, अत्याचार, स्वतंत्र्यानंतरही तसाच होत राहिला आहे. त्यांच्या जीवनमानात कोणताच बदल झाला नाही. एवढेच नव्हे तर पोटासाठी चोरी करताना इंग्रज काळात त्यांच्या कपाळी असणारा गुन्हेगारीचा शिक्का स्वांतत्र्योत्तर लोकशाही काळातही तसाच राहीला असल्याचे चित्र रेखाटले आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर खेडयापाडयातील लोकांच्या हाती लोकशाहीची सत्ता आली. त्याचा विकृत वापर खेडयातील लोकांनी कसा केला व शैक्षणीक विकासाला कशी खिळ घातली याचे चित्रण श्री.ना.पेडंसे यांच्या 'हद्दपार' या कादंबरीत केले आहे. या दशकातील बा.भ.बोरकरांच्या 'भावीण' मध्ये देवदासीचा प्रश्न, व्यंकटेश माडगूळकरांच्या 'पुढच पाऊल' मध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या शिकवणीमुळे आणि प्रबोधनामुळे दलित समाजात निर्माण झालेले चैतन्य आणि दलितांच्या वेदना, रिक्त आक्रोश याची जागा प्रतिकाराने कशी घेतली याचे चित्रण आले आहे. शांता शेळके (ओढ), मालतीबाई दांडेकर (हिरा आणी गारगोटी) भाऊ पाध्ये (डोंबायाचा खेळ) वसंत कानेटकर (घर) इत्यादी कादंब-यांमधून इंग्रजी सत्तेचा अत्याचार, देवदासींचे प्रश्न, दलितांमधली जागृती, खेडयातील लोकांची शहराकडे धांव, बाल संगोपन महत्व, जरठ कुमारी विवाह, कामगार चळवळीचे स्वरुप असे विविध सामाजिक प्रश्न या कादंब-यांनी अधोरेखित केले आहेत. लिला देशमुख (मी एकटीच जाणार), गो.नि.दांडेकर (शितू) दुर्गा भागवत (महानदीच्या तिरावर), शरचंद्र मुक्तिबोध (क्षिप्रा) वि.स.खांडेकर, (अश्रू) गो.नि.दांडेकर (जैत रे जैत, पडधवली, पवनाकाठचा धोंडी) व्यंकटेश माडगूळकर (बनगरवाडी) गंगाधर गाडगीळ (लिलिचे फुल), र.वा.दिघे (आई आहे शेतात) ना.ग.गोरे, (शंख आणि शिंपले) गो.नी.दांडेकर (माचीवरला बुधा, पूर्णामायची लेकरं) रणजीत देसाई (बारी) अण्णाभाऊ साठे (वैर,फकिरा) वि.स.खांडेकर (ययाति) उध्दव शेळके (धग-१९६०) इत्यादी कादंब-या या दशकांत प्रकाशित झाल्या. वाङ्मयावर तत्कालीन घटनाचा परिणाम तपासून पाहतांना २६ जानेवारी १९५० पासून भारतीय राज्यघटनेची अमंलबजावणी झाली. त्यात समानता तत्वानुसार घटनेतील १५ व्या कलमानुसार धर्म, जात, वंश, लिंग कारणाने भेदभाव करता येणार नाही हे स्पष्ट झाले, १९५५ सालचे गोवा मुक्ती आंदोलन, १९५६ सालचा कमाल जमीन धारण कायदा,१९५६ मधील राजगोपालचारी यांची स्वतंत्र पक्ष स्थापना, हैदराबाद संस्थानचे विलिनीकरण, हैदराबाद मुक्तिासंग्राम, ३० जानेवारी १९४८ रोजी झालेली राष्ट्रपिता महात्मा गांधीची हत्या, ग्रामसभा स्थापन्याचे बंधन, स्त्रीशिक्षण समिती, राज्य पुर्नरचना आयोग, कामगार चळवळी असे तत्कालीन सामाजिक घटनांचे संदर्भ कादंब-यांतून चित्रीत झाले आहेत.

१९६० नंतर मराठी साहित्यात दलित, ग्रामीण आणि स्त्रीवादी साहित्याचे प्रवाह निर्माण होऊ लागले. देशाला स्वातंत्र्य मिळूनही सामाजिक राजकीय, शैक्षणिक प्रगतीची पावले दीन-दलितांच्या स्त्रियांच्या आणि शेतक-यांच्या जीवनाकडे वळली नाही. ही संवेदन जागृती विविध प्रवाहांच्या माध्यमातून कादंबरीत अधिक तीव्रपणे आणि व्यापक दृष्टीने दृग्गोचार होऊ लागली.

गो.नी.दांडेकर (आनंदभुवन) श्री.ना.पेंडसे (रथचक्र) रणजित देसाई (स्वामी) शरच्चंद्र मुक्तीबोध (सरहद्द) अच्युत बर्वे (मातीचा वास) अण्णाभाऊ साठे (संघर्ष) ग.ल.ठोकळ (ठिगगी) पु.शि.रेगे (सावित्री) मनोहर तल्हार (माणूस) चि.त्र्यं.खानोलकर (रात्र काळी घागर काळी) भालचंद्र नेमाडे (कोसला-१९६३) ना.स.इनामदार (झेप) जयवंत दळवी (झेप) व्यंकटेश माडगूळकर (वावटळ) हमीद हलवाई (इंधन) र.वा.दिघे (कार्तिकी) चि.त्र्यं.खानोलकर (कोंडूरा) श्री.ना.पेंडसे (लव्हाळी) वि.स.खांडेकर (अमृतवेल) शिवाजी सावंत (मृत्यूंजय) मृणालिनी देसाई (पुत्र मानवाचा) जयवंत दळवी (महानंदा) मधू मंगेश कर्णिक (माहिमची खाडी) लक्ष्मीकांत तांबोळी (दूर गेलेले घर) बापुराव बागूल (सूड) पद्माकर गोवईकर (मुंगी उडाली आकाशी) आणि इतर कादंब-या प्रकाशित झाल्या.

१९६० मधील आचार्य विनोबांची देवदासी मुक्ती चळवळ, स्त्रियांची अपार कष्टमयता, कुष्ठरोग, व्यसनाधिनता, १९६२ मधील भारत चीन संघर्षाची नांदी, वर्गीय स्तर, भटक्या विमुक्ताचे अंतरंग, १९६०-६२ साली खेडयातील मुलांसाठी असलेले कॉलेजचे जीवन दर्शन, झोपडपट्टी वासियांचे प्रश्न, कुळकायदा व जमिनदार, खेडयातील राजकारणाचा सत्तासंघर्ष, हिंदू-मुस्लीम मनामनात असलेला जातीय ताणतणाव, १९५६ मधील धर्मांतर, आंतराष्ट्रीय समुहाचा परिणाम, साता-यातील प्रतिसरकार आंदोलन, स्त्रि शिक्षण , अश्या विविध सामाजिक परिस्थितीचा वेध या दशकातील कादंब-यांनी घेतला आहे.

१९७१ ते १९८० या कालखंडातील कादंब-यांमध्ये राजकीय, सामाजिक, धार्मिक, कौटुंबिक घटनांची स्थित्यंतर प्रकट होताना दिसतात. १९७० च्या दशकात खेडयांना शहरीकरणाचे वेध लागले. शहरात जाऊन नोकरी करणारी मुले व त्यांची खेडयाकडेच राहणारी बाकी नातेसंबंधातील मंडळी, आई-वडील यांचे संबंध तुटक होऊ लागले. भावनिक संबंध आणि संवेदनांना गुंगी येऊ लागली होती. कृषीक्षेत्रात यांत्रिकीरणाचा प्रारंभ झाला होता. राजकीय व्यक्तींची मानसिकता बदलू लागली होती. बांगलादेशाची निर्मिती, १९७२ चा दुष्काळ, शिक्षणक्षेत्राची अवहेलना, बाबांची भोंदूगिरी, अश्या अनेक घटनांचे सादपडसाद समाजमनावर आंक्रदत होते. या बदलांनी कादंब-यांमधून त्या स्थितीगतीचे चित्रण केल्याचे दिसते. या कालखंडात सुधा साठे (ऊन येईना माहेरा) मृणालिनी जोशी (मुक्ताई) दिलीप चित्रे (त्यांची व्याली अशी पोरे) प्रभाकर पेंढारकर (अरे संसार संसार) आनंद यादव (गोतावळा) ज्योत्स्ना देवधर (कुवॅरणी) रा.र.बोराडे (पाचोळा) गंगाधर गाडगीळ

(दुर्दम्य) ह.मो.मराठे (निष्पर्ण वृक्षावर भर दुपारी) श्री.ना.पेंडसे (ऑक्टोपस) केशव मेश्राम (हकिकत आणि जटायू) अरुण साधू (मुंबई दिनांक) ना.धो.महानोर (गांधारी) दि.बा.मोकाशी (आनंदओवरी) गौरी देशपांडे (कारावासातील पत्रे) किरण नगरकर (सात सकं त्रेच्याळीस) कमल देसाई (काळा सुर्य) वसंत आबाजी डहाके (अधोलोक) अनिल बर्वे (थॅंक्यू मिस्टर ग्लाड) भाऊ पाध्ये (राडा) भालचंद्र नेमाडे (बिढार) महादेव मोरे (प्रवाह) अरुण साधू (सिंहासन) भालचंद्र नेमाडे (जरीला) सुभाष सावरकर (व्हायरस) सुभाष भेंडे (अंधारवाटा) बाबा भांड (जरंगा) आनंद यादव (माऊली) विश्वास पाटील (आंबी) आनंद यादव (नटरंग) आनंद पाटील (कागूद आणि सावली) गौरी देशपांडे (एकेक पान गळावया) या लक्ष्यवेधी कांदब–यांचा उल्लेख करावा लागेल.

मराठी कादंबरीत सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक शैक्षणिक अश्या सर्वच घटना घडामोडीमुळे होणा–या सामाजिक उलथापालथीचे प्रतिबींब कमी अधिक प्रमाणात आढळून येते. १९८० साली देहू येथे झालेल्या संत तुकाराम महोत्सवातून गो.नी.दांडेकरांची “ तुका आकाशा एवढा ” ही कादंबरी वाचकांपुढे आली तर १९६२ च्या चीन युध्दात रस्त्याअभावी भारताला पत्करावी लागलेली हार “ रारंगढांग ” या कादंबरीतून व्यक्त झाली. १९७५ सालातील आणीबाणीतील पडसाद १९८२ मध्ये रंगनाथ पठारे यांच्या “ दिवे गेलेले दिवस ” या कादंबरीतून उमटले. आंतराष्ट्रीय पातळीवर वानरावर  झालेले संशोधन (व्यंकटेश माडगूळकर–सत्तांतर) १९८० साली अरब राष्ट्रात झालेली पराराष्ट्र मंत्र्यांची परिषद १९८३ मध्ये (विकास सारंग – एन्कोच्या राज्यात) तर १९८३ साली महाराष्ट्र शासनाने फक्त तीन अपत्ये असणा–यांना सोई सुविधा देण्यासंबंधीचे धोरण ‘हे ईश्वरराव हे पुरुषोत्तमराव’, या कादंबरीत उमटले आहे. नासाचा परग्रहारील मनुष्य वस्तीचा शोध जयंत नारळीकरांच्या ‘प्रेषित’ मध्ये डोकावतो तर विद्यापीठाच्या परीक्षेतून कॉपीप्रकार नाहीसे करण्याचे धोरण व त्याचा फटका विजय बर्वेच्या “ सकाळ ” या कादंबरीतून प्रतिबिंबीत होतो. १९९० पासून सुरु झालेली ग्रामीण चळवळ दादागिरी करणा–यांच्या हातात कशी गेली यांची वस्तुस्थिती रंगनाथ पठारे यांच्या “ रथ ” मधून व्यक्त होते.

१९८० ते १९८४ या चार वर्षात मराठवाडयातील विवाहित स्त्रियांच्या आत्महत्येचा आकडा दहा हजारावर पोचला यांची कारणमीमांसा करणारी गणेश आपटे यांची “ गणगोत ” ही कादंबरी १९८४ साली प्रकाशित झाली. देवदासींना वगळून १९७५ साली आंतराष्ट्रीय महिला वर्षाच्या निमित्याने स्त्रियांच्या समस्यांचा विचार पुढे आला. बळवंत कांबळे यांच्या “ नापत ” कादंबरीतून हा विचार व्यक्त झाला. १९७५ सालातील बीड जिल्हयातील गेवराई तालुक्यातील निपानी गावाची दलित झोपडपट्टी सवर्णानी जाळली. व त्यांच्यावर बहिष्कार टाकला या घटनेचे प्रतिबिंब नागनाथ कोतापल्ले यांच्या ‘उलट चालिला प्रवाहो’ या कादंबरीत पाहावयास मिळते. मुंबईतील चेंबुरची झोपडपट्टी उठवण्यासाठी प्रस्थापितांनी केलेले प्रयत्न (ह.मो.मराठे – प्रास्ताविक) सहकार क्षेत्राचा समग्र वेध (सहकार सम्राट)  राजकारणी लोकांची स्वार्थी प्रवृत्ती व क्रुरता (गांधारी) या कादंब–याची बलस्थाने आहेत. देवदासी स्त्रियांवर लौगिंक सक्ती करता येणार नाही असा कायदा होऊनही या स्त्रिया गावदास्यातून मुक्त झाल्या नाहीत. या घटनेचे प्रत्यंतर राजन गवस यांच्या “चौडंक” या कादंबरीत पाहवयास मिळते. बाबाराव मुसळे यांनी त्यांच्या ‘हाल्याहाल्या दूध दे” या कादंबरीतून ग्रामीण जीवनाची व्यथा तीव्रतणे अधोरेखित केली. आधुनिक युग सुरु झाले असले. तरी अद्याप ग्रामीण समाज बदलला नसल्याचे रा.र.बोराडे. यांच्या ‘सावट’ या कादंबरीत व्यक्त झाले आहे. तर स्वातंत्र्योतर काळातील चाळीस वर्षात ग्रामीण जीवनाची जडण घडण कशी झाली आहे. हे पुरुषोत्तम बोरकरांनी ‘मेड इन इंडिया’ या कादंबरीत मांडले आहे.

राजन गवस यांच्या ‘भंडारभोग’ या कादंबरीतून देवदासीच्या पुर्णवसनाचे प्रश्न अधोरेखित होतात. १९८५ सालापासून स्त्रीमुक्ती आंदोलनाने गती घेतली. त्यामुळे स्त्रियांना राजकारणात तीस टक्के आरक्षण देण्याचा ठराव झाला. काही अंशी स्त्रियांनी राजकारणात भागही घेतला. परंतू या स्त्रियांची हेळसांड व पुरुषी प्रवृत्तीचे प्रत्यंतर रा.र.बोराडे यांची ‘आमदार सौभाग्यवती’ ही कादंबरी देऊन जाते. संपूर्ण पृथ्वी जलमय होण्याची अफवा (रेखा बैजल अग्नीपुष्प, दुष्काळाचे थैमान व सक्तीची कर्जवसुली) (वासुदेव मुलाटे–विषवृक्षच्या मुळया) लैगिंक स्वैराचार (दुस्तर हा घाट) या घटनांसोबतच १९९० साली. शरद जोशींच्या नेतुत्वात शेतक–यांनी छेडलेल्या कांदा आंदोलनाचा वेध विश्वास पाटलांच्या ‘पांगिरा’ या १९९० साली प्रकाशित झालेल्या कादंबरीने घेतला आहे. काही कादंब–यात आजूबाजूच्या घटनांचे पडसाद स्पष्ट नसले तरी अस्पष्ट स्वरुपात सामाजिक, राजकीय, धार्मिक, कौटूंबिक जीवनातील बदल आणि घटनांचे प्रतिबिंब कादंबरीकारांनी आपल्या कादंब–यांतून रेखाटले आहे. सुरेश व्दादशीवर यांनी ‘हाकूमी’ या कादंबरीतून चंद्रपूर, गडचिरोली या भागातील नक्षलवादी चळवळीची माहिती व आदिवासींचे जीवन यावर प्रकाश टाकला आहे.

१९९० पासून जागतिकीकरण आणि संगणक युगाने जोर धरला. प्रसार माध्यमांची गती माणसाच्या बुध्दिच्या बाहेर गेली. खेडयापाडयापर्यत दूरदर्शन संच गेले. आणि दिल्ली ते गल्लीपर्यत धडणा–या सर्वच लहानमोठया घटना सर्वाना माहित होऊ लागल्या. जगाशी संपर्क सुकर झाला. प्रगतीचा वेग अफाट वेगाने धावू लागला. एकीकडे अफाट संपन्नता तर दुरारीकडे दारिद्रयाने गाजलेली विपन्नावस्था यामूळे ग्रामिण जिवन मूळातच ढवळून निघाले. येणारे नवे जग जुन्याला गाडून टाकीत, उध्वस्त करीत येत होते. या संक्रमणामुळे तळापासून हादरलेले ग्रामीण भावविश्व, त्यांचा ताण, झालेली उलथा–पालथ नव्वदोत्तरी कादंब–यामधून व्यक्त होऊ लागली.

१९९० साली अंधश्रध्दा निर्मूलन समितीने महाराष्ट्रातील बुवाबाजी विरुध्द आवाज अुठवला. उत्तम बंडू तूपे, यांच्या ‘खुळी’ या कादंबरीने या चळवळीचा वेध घेतला. १९९१ साली भारतीय राजकारणात ब–याच मोठया प्रमाणात दलित

नेते राजकारणात यशस्वी झाले परंतू दलित समाज मात्र वंचितच राहयला. या परिस्थितीने दलित नेत्यांना डॉ.बाबासाहेबांचे व रमाईचे स्मरण व्हावे यासाठी यशवंत मनोहरांची 'रमाई' कादंबरी घटनांचा वेध घेते. विश्वास पाटलांच्या 'झाडाझडती' या कादंबरीतून धरणग्रस्तांचे प्रश्न त्यांच्या पुर्णवसनाची समस्या, राजकीय पुढारी, अधिकारी यांच्या एकुण वर्तनाचा मागोवा घेते. विलास मनोहरांच्या 'नक्षलवाद्यांचा जन्म' या कादंबरीतून नक्षलवादी चळवळीचे प्रतिबिंब उमटते. पुरुष आणि स्त्रियांप्रमाणे तृतीयपंथीयांनाही जीवन जगण्याचा अधिकार आहे. ही बाब भारत सरकारने मान्य केल्यानंतर या घटनेचे चित्रण 'शिरवंडी' कादंबरीतून पुढे येते.

१९९१ मध्ये राजीव गांधी यांची हत्या झाली या घटनेचे पडसाद संजय सोनवणी यांच्या 'मृत्यूरेखा' या कादंबरीत आढळतात. जोगतीणी, मुरळी यांचे पुर्नवसन (बळवंत कांबळे-जोगण्याचे दिवस), अतिरेकी, गुंड यांच्याशी असलेले सिनेकलावंतांचे संबंध (चंद्रकांत काकोडकर-चौकटची राणी) यासह भारतीय राजकारण, समाजकारण व अर्थकारण उत्तरोत्तर भ्रष्टाचार आणि स्वार्थाच्या मार्गाने चालली असून आदर्शाची पायमल्ली करीत नितिमुल्याची लक्तरे कशी वेशीवर टांगल्या जात आहेत. याचे चित्रण रंगनाथ पठारे यांनी 'ताम्रपट' या कादंबरीत केले आहे. बाबरी मस्जिद उध्वस्त झाल्यानंतर बांगला देशातील मुसलमानांनी येथील हिंदूचा जो अनन्वित छळ केला. त्याचे चित्र १९९४ मध्ये तस्लीमा नसरीन यांच्या 'लज्जा' या कादंबरीत पाहावयास मिळते. उसतोड कामगारांची हत्या आणि आत्महत्या शेषराव मोहित्यांच्या 'अंस जगणं तोलाचं' या कादंबरीत डोकावतात.

शिक्षणसंस्यामधून संस्थाचालक शिक्षक प्राध्यापकांचा कसा छळ करतात याचे चित्रण 'दुःखाचे श्वापद' 'कोंडणातील जीणं' आणि 'कुरुक्षेत्र' या कादंबरीतून अधोरेखित होते. बाबुराव गायकवाड यांची 'आगं' ही कादंबरी मराठा विद्यापीठ नामांतरासाठी उद्भवलेल्या दंगली आणि जाळपोळी यांचा वेध घेते. 'पहाट' या कादंबरीने महिला सक्षमीकरण आणि सबलीकरणाचे चित्र रेखाटले आहे. माधव कोंडविलकरांनी शेतक-यांच्या आत्महत्येचे सत्र 'डावं' या कादंबरीतून दृग्गोचर केले आहे. संगणकातील व्हायरस 'व्हायरस' या कादंबरीतून पुढे आला आहे.

१९९१ ते १९९७ या काळातील अतिरेक्यांची अतिरेकी कृत्ये (सडेकर-सैनिक) दलीत नेत्यांचे विभाजन (पूर्वसंध्या) ब्राऊन शुगरचे वाढते प्रमाण (कामेरु) या घटनांनीही कादंबरीला विषय दिले. स्वातंत्र्यापुर्व काळापासून २००० पर्यतचा मराठी कादंबरीचा कालपट तपासून पाहताना समाजातील बारीक सारीक घटना, देशातील, परराष्ट्रातील व राज्यातील सांस्कृतिक, धार्मिक, राजकिय, आर्थिक, सामाजिक स्थित्यंतरे त्या त्या काळातील कादंबरीलेखकांना आशयसुत्रे पुरविण्याचे कार्य करीत असते. त्या घटना घडामोडीं तपशिल कधी विस्ताररुपाने तर कधी घटना-प्रसंगातून तर कधी व्यक्तीरेखांच्या मानसिक आंदोलनातून उजागर होत असतात.

साहित्य अकादमीने १९९० नंतर पुरस्कृत केलेल्या विश्वास पाटील यांची 'झाडाझडती' रंगनाथ पठारे यांची 'ताम्रपट', नामदेव कांबळे यांची 'राधववेळ', राजनगवस यांची 'तणकट' आणि सदानंद देशमुख यांची 'बारोमास' या कादंब-या सामाजिक स्थित्यंतराचा अचूक वेध घेऊन सामाजिक दस्तऐवज म्हणून आपले स्थान घट्ट करतात.

विश्वास पाटील यांची कादंबरी धरणाखाली दबलेल्या माणसांची व्यथा व्यक्त करते. विकासाचे स्वप्न दाखवित शासन-प्रशासन आणि स्वार्थी राजकारणी ग्रामीणांचे, त्यांच्या कृषी व्यवस्थेचे कसे शोषण करते यांचा एक समग्र पट आपल्यासमोर उभा करते. ' ताम्रपट' या कादंबरीतून रंगनाथ पठारे १९४२ ते १९७९ या कालखंडातील संपूर्ण महाराष्ट्राच्या राजकीय जीवनाचे विश्लेषण करुन सत्तास्पर्धा, सहकारी संस्था, शिक्षणसंस्था, दलितांचे व सर्वसामान्यांचे प्रश्न, जातीयता, सरळ आणि तिरप्या मानसांची मानसिक आंदोलने व्यापून काढते. गावात राहून पोटाची भूक भागविण्यासाठी मांग समाजाचा चाललेला संघर्ष, शिक्षणाने आलेले फुले-आंबेडकरी विचार प्रणालीचे भान आणि त्यामुळे निर्माण झालेले विविध सामाजिक प्रश्न नामदेव कांबळे यांची 'राधववेळ' ही कादंबरी उजागर करते.

गेल्या दोनतीन दशकातील समाजकारण आणि राजकारण यातील दिशाहीनता आणि मूल्यभ्रष्टता याचे विदारक चित्रण राजन गवस यांच्या 'तणकट' कादंबरीत येते. विविध जातीतील नवशिक्षित तरुणांना हतबल करुन टाकणारे समकालीन वास्तव यात टिपल्या गेले आहे. ज्वलत समस्या, आदर्शाचे विडंबन, मूल्यांचा -हास आणि चळवळीच्या फोफावण्यातून जाणवणारी उपक्रमशिलतेची निरर्थकता यांचे सावट मानवी संबंधातील मौलिकता कशी ग्रासून टाकते यांचे प्रत्यंतर ही कादंबरी देते.


सदानंद देशमुख यांच्या 'बारोमास' या कादंबरीला २००४ चा साहित्य आकदमीचा पुरस्कार प्राप्त झाला. जागतिकीकरणाचे परिणाम अधोरेखित करत एकूणच ग्रामीण कृषी व्यवस्था कशी उन्मळून पडते आहे. याचे चित्रण या कादंबरीत आहे. जागतिकीरणामुळे खेडयापाडयातील कृषीसमाजव्यवस्थेचे स्थित्यंतर आणि त्याचा होत असलेला परिणाम 'बारोमास' रेखाटते.

२००० नंतर आलेल्या कादंब-यामधूनही समकालीन सामाजिक स्थित्यंतरे अधोरेखित होताना जाणवतात. यंत्रयुग, संगणक युग, सांस्कृतिक आक्रमणे, श्रीमंत गरीब यातील मानसिक व्दंव्दे, बेकारी, सुखलोलूपता, चंगळवाद, स्पर्धा, तिरस्कार, हरवलेले माणूसपण, शेती व्यवसायातील आधुनिकीकरण, खेडयांचे भकासपण, महासत्तेची स्वप्ने यांनी कादंबरीची व्यापकता अधिक समृध्द केली आहे.

एड्स् या महाभयंकर रोगावरील राजन खान यांची 'थेंब थेंब मृत्यू' शेतक-यांच्या आत्महत्येवरील शेषराव मोहीते यांची 'धूळपेरणी' वर्तमान राजकारणाचा वेध घेणारी सुरेश द्वादशीवार यांची 'वर्तमान' २००५ साली त्सुनामी लाटांनी

किनारपट्टीला नेस्तनाबूत केल्यानंतरचे चित्रण करणारी प्रभाकर पेंढारकरांची चक्रीवादळ, किल्लारी परिसरातील भुकंपाचे दर्शन घडविणारी बाबा कदम यांची 'दुभंग' पारधी समाजाच्या लढयाचे चित्रण करणारी गिरीश प्रमुणे यांची 'पारधी' तर केळी उत्पादकांची व्यथा मांडणारी अशोक कौतिक कोळी यांची 'पाडा' या कादंब-या नवे प्रश्न घेऊन लिहल्या जात आहे.

एकूणच कादंबरी वाङ्‌मयाने सामाजिक स्थित्यंतराचा वेध घेत नवी आश्यसुत्रे निर्माण करीत सर्व स्तरातील विविध घटना घडामोडींचा परामर्श कादंबरी वाङ्‌मयात अधिक समर्थपणे मांडल्या गेल्या असून एक सामाजिक दस्तऐवज म्हणून विचार करायला लावणारा आहे.



***दिलीप अलोणे.***
वणी ता.वणी जि.यवतमाळ.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.org